आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२ फेब्रुवारी २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- यंदाच्या अर्थसंकल्पात प्राप्तीकरातल्या सवलती हेच प्रमुख वैशिष्ट्य असल्याची उद्योग जगताची प्रतिक्रीया

- गेल्या महिन्यात वस्तू आणि सेवा कर संकलन एक कोटी ९५ लाख रुपये

- टाटा मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेचा अंतिम सामना  विश्वविजेता डोम्मराजू गुकेश आणि ग्रँडमास्टर प्रज्ञानंद या दोघात रंगणार

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालील टी ट्वेंटी  विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, भारतापुढे विजयासाठी ८३ धावांचं लक्ष्य

**<><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या कर सवलतीं हेच प्रमुख वैशिष्ट्य असल्याची प्रतिक्रीया उद्योग जगताने व्यक्त केली आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न पूर्णपणे करमुक्त करणं हाच यंदाच्या अर्थसंकल्पातला सर्वात महत्त्वाचा मुद्दा असल्याचं मत उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांनी मांडलं आहे. यामुळे मध्यमवर्गीयांच्या हातात अधिक पैसे येतील, ज्यामुळे वस्तू, दुचाकी आणि प्रवास या क्षेत्राला चालना मिळेल, असं बिर्ला यांनी सांगितलं.

तर, मूलभूत कार्यांसाठी पैसा देणं आणि आर्थिक क्षेत्रात सावधगिरी बाळगायचा प्रयत्न करणं यातला सरकारचा कसोशीनं प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसून येत असल्याचं निरीक्षण आर्थिक आयोगाचे माजी सल्लागार रथिन रॉय यांनी नोंदवलं आहे.

पर्यटन, चामडे आणि पादत्राणे उद्योग तसंच सागरी क्षेत्राला या अर्थसंकल्पात दिलेलं प्रोत्साहन रोजगारनिर्मितीसाठी फार महत्वाचं ठरेल असं फिक्की चे अध्यक्ष हर्षवर्धन अगरवाल यांनी म्हटलं आहे. करसवलतीची कक्षा ७ लाखांपासून १२ लाखापर्यंत वाढवणे तसेच भांडवली खर्च कायम ठेवणे ही या अर्थसंकल्पाची मोठी वैशिष्ट्ये असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

जानेवारी २०२५ या महिन्यात एक कोटी ९५ लाख रुपये वस्तू आणि सेवा कर महसूल जमा झाला आहे. जानेवारी २०२४ च्या तुलनेत या महिन्यात कर महसूलात १२ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ झाली आहे. या महिन्यात केंद्राचं वस्तू आणि सेवा कर संकलन ३६ हजार ७७ कोटी रुपये आणि राज्याचं वस्तू आणि सेवा कर संकलन ४४ हजार ९४२ कोटी रुपये इतकं आहे. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर संकलन १ लाख कोटी रुपये तर उपकर संकलन १३ हजार ४१२ इतकं आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार उद्या संध्याकाळी संपणार आहे. भाजपा, आमआदमी पार्टी आणि काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष रिंगणात असून मतदारांना आकर्षित करण्यासाठी जोमाने प्रचार करत आहेत. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आरके पुरम इथं आज जाहीर सभा होणार आहे, तर भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह राजेंद्र नगर, चांदणी चौक आणि लक्ष्मी नगर इथं सभा घेणार आहेत. काँग्रेस नेते अजय माकन आज दिल्लीत पत्रकार परिषद घेणार असून सत्ताधारी आम आदमी पक्षाचा प्रचारही जोमाने सुरु आहे.

७० सदस्यांच्या दिल्ली विधानसभेसाठी येत्या बुधवारी पाच तारखेला मतदान होणार आहे; तर आठ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

**<><><><><>**

देशभरात आज वसंत पंचमी साजरी होत आहे. या दिवशी विद्येची देवता सरस्वती देवीची पूजा केली जाते, तसंच वसंत ऋतूचं स्वागत करून निसर्गातील नवनिर्मितीचा उत्सव साजरा केला जातो.

शिक्षण आणि ज्ञानाचं महत्व सांगणारा तसंच समृद्धी आणि आनंदाचा उत्सव साजरा करणारा हा दिवस असून सर्व देशवासियांना शुभेच्छा देत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी  मुर्मू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्ट वर लिहिलं आहे. लवकरच भारत जागतिक स्तरावर ज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येवो अशी प्रार्थना त्यांनी केली आहे.

समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनीही देशवासियांना वसंतपंचमीच्या शुभेच्छा  दिल्या आहेत.

<><><><><>

सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं 'हर कंठ में भारत' हा विशेष शास्त्रीय संगीत कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम आजपासून १६ फेब्रुवारीपर्यंत दररोज २१ आकाशवाणी केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते साडेदहा पर्यंत थेट प्रक्षेपित केला जाईल. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला आणि प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर याही यावेळी उपस्थित होत्या.

‘हर कंठ में भारत’ हा उपक्रम युवा कलाकारांना त्यांची प्रतिभा राष्ट्रासमोर सादर करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करेल, असं सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला यांनी आकाशवाणीशी विशेष संवाद साधताना सांगितलं. या कार्यक्रमात शास्त्रीय, आणि लोक संगीताच्या सर्व प्रकारांचा समावेश  असेल, अशी माहिती त्यांनी दिली. सांस्कृतिक मंत्रालयाचा हा एक अनोखा उपक्रम असून त्यामुळे केवळ कलाकारांनाच नव्हे, तर आकाशवाणीलाही तिचा श्रोतृवर्ग वाढवण्यासाठी सहाय्यभूत ठरेल, असं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. पालिवाल यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

नेदरलँड्स इथे सुरु असलेल्या टाटा मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत आता विश्वविजेता डोम्मराजू गुकेश आणि ग्रँडमास्टर प्रज्ञानंद हे दोघे आमने सामने आले असून अंतिम सामना त्या दोघांमध्ये होईल.

उपांत्य फेरीत काल प्रज्ञानंद ने सर्बियाच्या अलेक्सी सरेना याचा पराभव केला , तर नेदरलँड्स च्या जॉर्डन व्हॅन फॉरिस्ट शी झालेला सामना गुकेशने बरोबरीत सोडवला होता.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालील टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेतल्या अंतिम सामन्यात, दक्षिण आफ्रिकेनं विजयासाठी भारतापुढे ८३ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. दक्षिण आफ्रिकेचा डाव अडखळत सुरू झाला. सिमोन लॉरेन्सला पारुनिका सिसोदियानं त्रिफळाचित करत दक्षिण आफ्रिकेचा पहिला बळी मिळवला. त्यानंतर जेम्मा बोथा आणि दियारा रामलकन या लागोपाठ बाद झाल्या. काराबो मेसो, मिकी वुर्स्ट आणि फे काऊलिंग या तिघींचा अपवाद वगळता इतरांना दोन अंकी धावसंख्याही गाठता आली नाही.

<><><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या कर्नल सी के नायडू जीवन गौरव पुरस्कारानं ज्येष्ठ क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांना काल गौरवण्यात आलं. मुंबईत झालेल्या नमन पुरस्कार समारंभात आय सी सी चे

अध्यक्ष जय शाह यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला . यावेळी गोलंदाज जसप्रीत बुमराह याला पॉली उम्रीगर पुरस्कारानं तर महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधाना हिला उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज संध्याकाळी मुंबईत खेळला जाणार आहे. या मालिकेत भारताने ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. दरम्यान, टी-२० मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने होणार आहेत.

**<><><><>**

इस्त्राएलमधे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी संरक्षण दलाचे प्रमुख म्हणून मेजर जनरल एयाल जमीर यांची नेमणूक केली आहे. ते येत्या ६ मार्चला पदभार स्वीकारतील. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्त्राएलवर झालेल्या हल्ल्याची नैतिक जबाबदारी पत्करून   या आधीचे संरक्षण दल प्रमुख लेफ्टनंट जनरल हेरझी हलेवी यांनी गेल्या महिन्यात प्रमुखपदाचा राजीनामा दिला होता.

**<><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या करांना प्रतिसाद म्हणून, कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टिन ट्रुडो यांनी देशात येणाऱ्या १५५ अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन वस्तूंवर २५ टक्के कर लावायची घोषणा केली आहे. ओटावा इथं वार्ताहर परिषदेत बोलताना, ट्रूडो यांनी मंगळवारपासून ३० अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन वस्तूंवर २५ टक्के कर लावायची घोषणा केली आणि २१ दिवसांत १२५ अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन वस्तूंवर असाच कर लावायची घोषणा केली.

**<><><><><>**

गुजरातच्या डांग जिल्ह्यात सापुतारा घाटात दोनशे फूट दरीत बस कोसळून आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले आहेत. ही बस भाविकांना घेऊन महाराष्ट्रातल्या त्र्यंबकेश्वर इथून गुजरातमधल्या द्वारका इथं जात होती. सर्व भाविक मध्यप्रदेशातले रहिवासी आहेत. जखमी  प्रवाशांना अहवा इथल्या रुग्णालयात दाखल केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज अंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी एका प्रवाशाकडून काल एक किलो ६४९ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ जप्त केले. त्याचं आंतरराषट्रीय बाजार पेठेतलं मूल्य अंदाजे १६ कोटी ४९ लाख रुपये इतकं आहे. पॅरिसमार्गे मुंबईला आलेल्या

प्रवाशाकडून  पांढऱ्या रंगाच्या १७० कॅप्सूल जप्त करण्यात आल्या, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**